# Notification
## सूचना

म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ अंतर्गत लघुटंकलेखक संवर्गात जाहीरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ५० गुणांच्या व्यावसायिक चाचणी सह २५० गुणांची परीक्षा असणार आहे. लघुटंकलेखक संवर्गात कागदपत्र सादर करण्याकरीता गुणवत्ता यादीवर घेतलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार कागदपत्र सादर करण्याकरीता उपस्थित होते. तसेच कागदपत्र सादर करताना ज्या उमेदवारांनी लघुलेखनाचे ८० शब्द प्रति मिनीट किंवा त्यापेक्षा जास्त वेगाचे प्रमाणपत्र सादर केले आहे त्या सर्व उमेदवारांची लघुलेखनाची व्यावसायिक परीक्षा रविवार दिनांक ०४.१२.२०२२ रोजी म्हाडा कार्यालय, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ येथे घेण्यात येईल. परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे असणार आहे.

१. लघुलेखनाची व्यावसायिक चाचणी परीक्षा ५० गुणांची असणार आहे.

२. परीक्षेकरीता उपस्थित उमेदवारांना ४० शब्दांचा उतारा ५ मिनीटांच्या कालावधीत वाचून दाखविण्यात येईल.

३. उमेदवारांनी त्यांना पुरविण्यात आलेल्या नोटेशन्स बुकवर लघुलेखन / श्रुतलेखन करावयाचे आहे.

४. त्यानंतर लगेच उमेदवारांना पुरविण्यात आलेल्या उत्तरपत्रिकेवर उतारा सुवाच्छ व वाचण्याजोग्या हस्ताक्षरामध्ये लिहून काढावयाचा आहे. उतारा लिहून काढण्याकरीता उमेदवारांना एक तासाचा अवधी दिला जाईल.

५. ४०० शब्दांच्या उता-यामध्ये उत्तरपत्रिका तपासणीमध्ये १० टक्केपेक्षा जास्त चूका करणा-या उमेदवारास लघुलेखन परीक्षेत अनुत्तीर्ण करण्यात येईल. लघुलेखन परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये निवडीकरीता विचार केला जाणार नाही.

६. १० टक्केपेक्षा कमी चूका केलेल्या उमेदवारांचे प्रत्येक चूकीला एक गुण वजा करण्यात येईल. उदा. ज्या उमेदवारांने लघुलेखन चाचणी परीक्षेत २२ चुका केल्या असतील त्या उमेदवारास ५० गुणांपैकी २८ गुण देण्यात येतील.

७. उत्तीर्ण उमेदवाराचे लघुलेखन चाचणी परीक्षेत प्राप्त गुण त्यांच्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांमध्ये जोडण्यात येउन एकूण २५० गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

८. दि.०४.१२.२०२२ रोजी उमेदवारांनी वर दिलेल्या पत्त्यावर सकाळी ०८.३० वा. हजर रहावयाचे आहे. परीक्षेकरीता सकाळी ०९.३० वाजेपर्यंत उमेदवारांना परीक्षाकेंद्राच्या आत प्रवेश दिला जाईल. उशिरा येणा-या उमेदवारास अनुपस्थित धरले जाईल.

९. परीक्षा केंद्राच्या आत उमेदवारास मोबाईल फ़ोन, अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे, स्मार्ट वॉच, वायरलेस श्रवणेंद्रिय उपकरणे इ. घेऊन जाण्यास मनाई आहे. परीक्षा केंद्राच्या आत अशी उपकरणे घेऊन जाण्याचा प्रयत्न करणे किंवा परिक्षा केंद्राच्या आत अशा प्रकारची उपकरणे उमेदवाराजवळ आढळून आल्यास त्यांना परीक्षा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल, तसेच त्यांचे विरुध्द पोलीस यंत्रणेकडे गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१०. उमेदवाराने परीक्षेस येताना त्याचे नाव, फ़ोटो व पत्ता नमूद असलेले राज्य/केंद्र शासनाने वितरीत केलेले मूळ ओळखपत्र व त्याची एक छायाप्रत सोबत आणावयाची आहे.

११. प्रत्येक उमेदवाराने येताना एक निळ्या रंगाचा बॉल पॉईंट पेन सोबत आणावयाचा आहे.

१२. ज्या उमेदवारांनी कागदपत्र सादर करताना मराठी भाषेचे लघुलेखन प्रमाणपत्र सादर केले आहे त्यांची मराठी भाषेमध्ये लघुलेखन चाचणी परीक्षा घेण्यात येईल. ज्या उमेदवारांनी इंग्रजी मधील लघुलेखनाचे प्रमाणपत्र सादर केले आहे त्यांची इंग्रजी भाषेमध्ये लघुलेखनाची परीक्षा घेण्यात येईल. तसेच ज्या उमेदवारांनी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेमधील लघुलेखनाचे प्रमाणपत्र सादर केले आहे त्यांना मराठी किंवा इंग्रजी किंवा दोन्ही भाषेमधून परीक्षा देता येईल. दोन्ही भाषेमधील प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांनी त्यांना वर नमूद ३ पर्याया पैकी एक पर्याय तात्काळ adm.off.mhada@gmail.com या इमेल वर कळवायचा आहे.

परीक्षेला बोलावण्यात येत असलेल्या उमेदवारांची सूची या सूचनेसोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ अंतर्गत घेण्यात येणा-या लघुलेखन व्यावसायिक चाचणी परीक्षेसंबधी सूचना वेळोवेळी म्हाडाच्या www.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. सर्व उमेदवारांनी वारंवार संकेतस्थळास भेट देऊन परीक्षेसंबधी सूचनांचे अपडेट्स घ्यावयाचे आहेत.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**